# प्रेस नोट

# वरिष्ठ राष्ट्रीय रग्बी स्पर्धा - २०२१ महाराष्ट्र राज्य रग्बी संघाने उपविजेते पद प्राविण्य प्राप्त केले

वरिष्ठ राष्ट्रीय रग्बी स्पर्धा - २०२१ दि. १७ ते १९ डिसेंबर २०२१ मध्ये, भुवनेश्वर ओडीसा येथे पार पडली. महाराष्ट्र पोलीस दलामधील रग्बी खेळाडू पोना/५५७,पप्पु तोडकर, नेमणूक - रा.रा.पो.बल.गट. १,**(महाराष्ट्र राज्य रग्बी संघ कर्णधार)** पोना/०९ योगेश कनोजिया, रा.रा.पा.बल.गट.८ गोरेगांव, मुंबई, सहा.पोलीस निरीक्षक अजित पाटील, प्रशिक्षक व व्यवस्थापक म्हणुन यांची निवड, महाराष्ट्र राज्य रग्बी असोशिएशन मुंबई, यांच्याकडुन करण्यात आली होती.

महाराष्ट्र पोलीस दलामधील रग्बी खेळाडूंनी वरिष्ठ रग्बी स्पर्धेमध्ये रौप्य पदक प्राप्त कामगिरी करुन इतिहास रचलेला आहे.






सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य रग्बी संघाने उपविजेतपद प्राप्त केले असून महाराष्ट्र पोलीस रग्बी संघामधील उपरोक्त दोन खेळाडूंचा समावेश आहे.

कोरोना - १९ या महामारीमुळे सरावामध्ये खंड पडून सुध्दा आणि कोरोना नियमांचे काटेकोर पणे पालन करुन आपल्या सरावामध्ये सातत्य राखून सदर खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. प्रशिक्षक/ व्यवस्थापक सहा.पोलीस निरीक्षक, अजित पाटील, मुंबई यांनी खेळाडूंकडून उत्कृष्ठ प्रकारे सराव घेवून वेळोवळी त्यांना प्रोत्साहन केले. सदर रग्बी खेळाडू प्रशिक्षणार्थी साठी आज प्रेरणादायी ठरत आहे.

महाराष्ट्र पोलीस रग्बी संघाची आजपर्यंतची वरिष्ठ रग्बी स्पर्धेमधील सर्वोत्कृष्ठ कामगिरी असून श्री. संजय पांडे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्री. अनुपकुमार सिंग, अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन) म. रा. मुंबई, सहाय्यक क्रीडा अधिकारी श्री. जुनेद खान, आणि सहा.पोलीस निरीक्षक, अजित पाटील, प्रशिक्षक/पोना, रणजीत जांभळे, मुंबई यांनी वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन देवून मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांच्यामधील उणिवा दूर करुन खेळातील कार्यक्षमता व मानसिक संतुलन उच्चतम राहिल असे वातावरण तयार केले. अशा केलेल्या प्रयत्नामुळे व मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामधील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत.

(जुनेद खान)
सहाय्यक क्रीडा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य पोलीस, मुंबई.